महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विदयापीठ मार्ग, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

दुरध्वनी क्र. ०२०-२५६७६८१८, २५५५९२०० Email:- principal.gppune@dtemaharashtra.gov.in

---

जा.क्र. शातंनिपु/पवि/२०२१/ 988 दिनांक 24 MAY 2021

**विद्यार्थ्यांसाठी सूचना**

विषय – सम २०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी (Course registration) केलेल्या व सरासरी (Average) पद्धतीने निकाल जाहीर झालेल्या विषयांच्या पुन:परीक्षेसाठी - सम २०२० परीक्षेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आवेदनपत्र सादर करणेबाबत

संदर्भ – १. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुबई यांचे परिपत्रक जा. क्र. मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३ दिनांक १५ मे २०२०
२. संस्थेच्या अभ्यास मंडळाचे दिनांक १५/०५/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्देश

कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्या अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे सम २०१९ सत्रामध्ये १८० गुणांक पूर्ण न होणाऱ्या, या संस्थेच्या सर्व नियमित विद्यार्थ्यांचा (सम २०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी केलेले विद्यार्थी), सम २०१९ सत्राचा निकाल जाहीर करतेवेळी फक्त लगतच्या अगोदरच्या एका सत्राचे ५०% गुणांच्या आधारावर व सम २०१९ सत्राच्या ५०% अंतर्गत गुणांच्या आधारावर गुण देऊन निकाल तयार करण्यात आला व अशा सरासरी गुणपद्धतीने संस्थेचा सम २०१९ सत्राच्या नियमित विषयांचा निकाल १० ऑगस्ट २०२० रोजी जाहीर करण्यात आला.

उपरोक्त नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सम-२०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी केलेल्या व सरासरी पद्धतीने निकाल जाहीर झालेल्या विषयांची पुन:परीक्षा देण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा सम-२०२० सत्रामध्ये घेण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे दिनांक २५/०५/२०२१ ते दिनांक ०२/०६/२०२१ या कालावधीत आवेदनपत्र सादर करावीत.

विषयांच्या पुन:परीक्षेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आवेदनपत्र सादर करताना खालील बाबींची नोंद घ्यावी -

१. विषयांच्या पुन:परीक्षा या फक्त लेखी परीक्षेसाठी लागू राहतील.
२. विषयांच्या पुन:परीक्षेसाठी सम-२०१९ सत्रामध्ये विषय नोंदणी केलेल्या व सरासरी (Average) पद्धतीने निकाल जाहीर झालेल्या सर्व विषयांची परीक्षा नोंदणी करावी लागेल.

१. या परीक्षेची नोंदणी फी रु. ६००/- आहे. सदर परीक्षा फी खाली दिलेल्या बँक खात्यात जमा करावी –
Account number – 06910100011631
Account name – Principal Government Polytechnic Pune
Bank name – Bank of Baroda Bank address – S. B. Road Pune IFSC code – BARB0POOSEN
२. विद्यार्थ्यांनी संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला 'Course Re-Examination Form – Even 2020 Term' हा फॉर्म संपूर्णपणे भरावा. भरलेला सदर फॉर्म exam.dept@gppune.ac.in या email वर, subject मध्ये '*Application for Course Re-Examination –Even 2020 Term – Enrl No –* ' असे लिहून, सोबत परीक्षेची फी भरल्याचा तपशील download करून (pdf/jpg file) तसेच सम २०१९ सत्राच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडून, पाठवावा. विद्यार्थ्यांची परीक्षा फी काही कारणास्तव बँकेत जमा झाली नसल्यास त्यास सर्वश्री विद्यार्थी जबाबदार असतील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
३. विषयांच्या पुन:परीक्षेत गुणवाढ झाल्यास विद्यार्थ्यांना सम-२०१९ सत्राची मूळ गुणपत्रिका परीक्षा विभागात जमा करावी लागेल व तदनंतर त्यांना सुधारीत गुणपत्रिका देण्यात येईल.
४. विषयांच्या पुन:परीक्षेसाठी आवेदनपत्र विहित कालावधीत सादर करावीत. मुदतीनंतर आलेल्या आवेदनांचा विचार केला जाणार नाही, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

परीक्षा नियंत्रक,
परीक्षा विभाग
शासकीय तंत्रनिकेतन पुणे

प्रत – १. मा. प्राचार्य यांना माहितीस्तव सविनय सादर
२. सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की त्यांनी यासंबंधी विद्यार्थ्यांना अवगत करावे.
३. संगणक विभागप्रमुखांमार्फत संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी